"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"
दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३
**WEB SITE** : **http://www.nkgsbsangh.org**
**E-MAIL** : **nkgsbs@gmail.com**
कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।।पुरुषार्थ एवं परमार्थ।।

मूल्य रु. ५

क्रमांक ३ वर्ष : ३५ ऑक्टोबर-डिसेंबर २०१३

**BOOK PACKET (PERIODICAL)**
Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

## दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी.संघ आणि
## दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी.इंडस्ट्रीयल अँड एज्यु. सोसायटी

# वार्षिक स्नेहसंमेलन - २०१३

## निमंत्रण पत्रिका

**ज्ञातीतील सर्व बंधुभगिनींना नम्र विनंती आहे की आपण सर्वांनी ज्ञातीच्या येत्या वार्षिक स्नेहसंमेलनास उपस्थित राहून शोभा आणावी व कार्यक्रम यशस्वी करण्यास साहाय्य करावे.**

**प्रमुख पाहुण्या** : श्रीमती सुजाता (सरल) सुधीर यार्दी
(Director Dept. of Physiotherapy, Dr. D. Y. Patil University)

**स्थळ** : डॉ. अंटोनिओ डिसिल्व्हा ट्रस्ट हॉल, कबुतरखाना, दादर.

**दिनांक** : रविवार २४ नोव्हेंबर २०१३, सायं. ४.१५ वाजता

## कार्यक्रम

- स्वागत गीत
- संघ व एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षांची भाषणे
- प्रमुख पाहुण्यांचे मनोगत
- विशेष सत्कार (तपशील पृ. ४ वर)
- संघातर्फे : १. श्री. दुर्गानंद वामन गायतोंडे
  २. श्री. वसंत महारुद्र कसबेकर (निधनोत्तर)
- एज्यु. सोसायटी तर्फे : १. श्री. दिलीप माधव मुझुमदार
- मध्यंतर
- विवाहाची सुवर्णजयंती ओलांडणाऱ्या व जोडप्यांचा ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा सत्कार.
- कवळेंमठ संस्कृत पाठांतर स्पर्धेतील विजेत्यांना व एज्यु. सोसायटीतर्फे गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना श्रीमती यार्दी यांच्या हस्ते बक्षिसे.

स्नेह संमेलनासाठी वेगळे निमंत्रण पाठविले जाणार नाही.
याची कृपया नोंद घ्यावी.

**प्रेमानंद शं. नाडकर्णी**
कार्याध्यक्ष – संघ

**देवदास अ. नाडकर्णी**
कार्याध्यक्ष – एज्युकेशन सोसायटी

# संपादकीय

## आगामी स्नेहसंमेलनाच्या प्रमुख पाहुण्या
## फिजियोथेरपी अद्यापनक्षेत्रातील तज्ज्ञ श्रीमती सुजाता यार्दी

वांद्रे येथे राहणाऱ्या श्रीमती सुजाता सुधीर यार्दी (पूर्वाश्रमीच्या सरल मंगेश (काशा)गंडभीर) या मुंबईमध्ये फिजियोथेरपी विषयाच्या अध्यापन क्षेत्रातील अधिकारी व्यक्ती म्हणून ख्यातनाम आहेत. १९९४ साली मुंबई विद्यापीठाच्या एम्. एस्सी.(फिजियोथेरपी) या परीक्षेत त्या प्रथम क्रमांकाने उतीर्ण झाल्या होत्या व त्याबद्दल त्यांना सुवर्णपदक मिळाले होते. नंतर २००१ पर्यंत त्यांनी नायर हॉस्पिटलमध्ये अनुभव घेतला व अध्यापनही केले. तेथे त्यांना रुग्ण व त्यांचे आप्तेष्ट यांच्यासाठी दाखविलेली कर्तव्य निष्ठा व निरलस सेवा याचे कौतुक म्हणून त्यांना डॉ. नायर स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.

२००१ पासून गेली १२ वर्षे त्या नेरुळ येथील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या फिजियोथेरपी विभागांत काम करत आहेत. सध्या त्या प्राध्यापक व संचालक या पदावर आहेत. त्यांच्या योगदानाचा आलेख सतत चढताच राहिला. त्यांना इंडियन असोसिएशन ऑफ फिजियोथेरपी या शिखर परिषदेतर्फे 'Luminary of Physiotherapy' हे प्रशस्तीपत्रक मिळालेले आहे. फिजियोथेरपी क्षेत्रात सर्वांत प्रतिष्ठेचा समजला जाणारा 'Fellowship Award from the Indian Association of Physiotherapy' हा पुरस्कार त्यांना २०१० साली मिळाला होता. त्या एम्. एस्सी. व पी. एच्. डी विद्यार्थ्यांना गाईड म्हणून शिकवतात. ऑक्टोबर २०१२ मध्ये 'Inaugural National Conference on Community Physiotherapy' या परिषदेचे त्यांनी कार्याध्यक्ष म्हणून काम केले. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या अनेक नियतकालिकांतून आंतापर्यंत त्यांचे सुमारे तीस संशोधनात्मक लेख छापून आलेले आहेत.

श्रीमती यार्दी यांचे कुटुंब अध्यापनक्षेत्राशी निगडीत होते. त्यांचे सासरे प्रा. व्ही. टी. यार्दी हे रुईया कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून प्रसिध्द होते. विवेकानंद क्लासेसचे ते भागीदार.होते. त्यांचे वास्तव्य असलेल्या वरळी परिसरातील गरीब जनतेसाठी म्हणून त्यानी जनता स्कूल सुरु केले होते. श्रीमती यार्दी यांचे पती प्रा. सुधीर यार्दी हे विल्सन कॉलेजमध्ये अध्यापन करीत होते. सध्या प्रसारमाध्यमांत प्रकर्षाने झळकत असलेली तारका आश्विनी यार्दी ही श्रीमती यार्दी यांचीच बहुरानी होय.

आगामी दीपावलीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा....!

१ ऑक्टोबर २०१३

द.ना.नाडकर्णी

## २४ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या स्नेहसंमेलनातील सत्कारमूर्तींचा त्रोटक परिचय

**श्री. दुर्गानंद वामन गायतोंडे**

यांच्या कार्याची माहिती 'प्रकाशझोत' या सदरात दिलेली आहे (पृ. ५)

**कै. वसंत महारुद्र कसबेकर**

सचिवालयात अण्डर सेक्रेटरी या पदावरुन निवृत्त झाल्यावर त्यांनी लगेच आपला संघ व एज्युकेशन सोसायटी या उभय संस्थांसाठी स्वत:ला वाहून घेतले. उतारवयात सुध्दा ते चेम्बूर ते ग्रांटरोड हा दगदगीचा प्रवास दिवसाआड करीत असत. त्यावरुनच त्यांची निष्ठा दिसून येते. संघाचे उपाध्यक्ष व सोसायटीचे खजिनदार ही महत्वाची पदे त्यांनी भूषविली २०११ साली त्यांचे निधन झाले. ३१ ऑगस्ट रोजी भरलेल्या संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत त्यांना सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत करण्यात आले म्हणून स्नेहसंमेलनात त्यांचा निधनोत्तर सत्कार करण्यात येत आहे.

**श्री. दिलीप माधव मुझुमदार**

कारवारकरांशी निगडीत असलेल्या सामाजिक संस्था व अशा संस्थांचे मोफत अथवा नाममात्र शुल्क घेऊन हिशेब तपासनीस म्हणून काम करणारी 'बोरकर अँड मुझुमदार' ही कंपनी म्हणजे एक समीकरणच झाले आहे. अशा या कंपनीचे ज्येष्ठ भागीदार श्री. दिलीप मुझुमदार यांना २००४ साली ज्ञातीच्या स्नेहसंमलनात प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रीत करण्यात आले होते तेव्हा मुखपत्रिकेच्या अंकात त्यांचा परिचय आलेलाच आहे. ३१ ऑगस्ट रोजी भरलेल्या एज्युकेशन सोसायटीच्या वार्षिक सर्वसाधारणसभेत त्यांना सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत करण्यात आले. त्याबद्दल स्नेहसंमेलनांत त्यांचा जाहीर सत्कार करण्यात येत आहे.


MIPL

MANGSIDHESH INVESTMENT PVT. LTD.

Financial Advisors | Equity Trading | Public
Mutual Funds | RBI Bonds | LIC, Mediclaim
Postal Schemes

Corporate Office

Bldg. No. 1, Flat No. 1A, Saraswati Baug, HFS Road, Jogeshwari (E), Mumbai - 400 060.
Tel.: 2836 2057 / 2824 5298 / 6457 1272 - 85

## प्रकाशझोत

### पुणे येथील 'भारत विश्व ज्ञानपीठम्' तर्फे 'कर्मयोगी दुर्गानंद गायतोंडे' यांचा सत्कार

पुणे येथे 'भारत विश्व ज्ञानपीठम्' या नावाची संस्कृत भाषा व त्यातील ज्ञान यांचा अभ्यास व प्रसार करणारी एक अग्रगण्य संस्था आहे. या संस्थेतर्फे दर ऋषिपंचमीच्या दिवशी विविध क्षेत्रांतील अकरा ऋषितुल्य व्यक्तींचा वैदिक पध्दतीनुसार जाहीर सत्कार केला जातो. त्यानुसार यंदाही हा सत्कार सोहळा १० सप्टेंबर रोजी संपन्न झाला. या अकरा व्यक्तींमध्ये कर्मयोगी दुर्गानंद गायतोंडे यांचाही समावेश होता.त्यांच्या समवेत वाणिज्य व्यवस्थापन तज्ज्ञ डॉ. शेजवळकर, गान पंडिता कुसुम शेंडे, जेष्ठ साहित्यिक व मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. यु. म. पठाण, पंडिता डॉ. प्रभा अत्रे इत्यादी दिग्गजांचाही समावेश होता यावरुनच या सत्काराची पतिष्ठा समजून येते.

श्री. गायतोंडे यांची जन्म तारीख २९ मार्च १९१९ म्हणजे त्यांनी आता ९५ व्या वर्षात पदार्पण केलेले आहे. अजूनही ते तरुणांना लाजवेल अशा उत्साहाने व ईर्षेने वाचन, मनन, लेखन, समाजकार्य यात मग्न असतात. त्यांची सतत पुणे–मुंबई ये–जा असते. 'कर्मयोगी जीवनाचा आदर्श' म्हणूनच त्यांचा सन्मान करण्यात आला.

श्री. गायतोंडे यांनी बऱ्याच आंतरराष्ट्रीय उद्योगसमूहात जबाबदारीच्या पदांवर काम केलेले आहे. त्यांच्या कामाच्या स्वरुपामुळे कामगारांच्या कँटीनपासून पचतारांकित बोर्डरुमपर्यंत त्यांचा संचार असे. रंकापासून रावापर्यंत प्रत्येकाच्या आर्थिक, प्रापंचिक, शैक्षणिक समस्यांविषयी त्यांना प्रत्यक्ष अनुभव आहे. गीता, उपनिषदे, स्वामी विवेकानंद, पाश्चिमात्य तत्ववेत्ते याविषयी त्यांचा अभ्यास दांडगा आहे. त्यामुळे त्यांच्या पुस्तकी ज्ञानाला वास्तववादी अनुभवाची जोड मिळाल्यामुळे त्यांच्या विचारांना खोली प्राप्त झाली आहे. विविध क्षेत्रांतील अनेक सामान्य व असामान्य व्यक्तींशी त्यांचा दांडगा संपर्क आहे. नोकरीमुळे कराचीपासून कलकत्त्यापर्यंत अनेक प्रदेशात वास्तव्य झाल्याने त्यांना विविध संस्कृतीचे जवळून दर्शन झालेले आहे व त्यांचे जीवन वैचारिक दृष्ट्या समृध्द बनले आहे. त्याचे प्रतिबिंब त्यांनी वेगवेगळ्या विषयावर इंग्रजी व मराठी भाषेतून लिहिलेल्या अनेक पुस्तकांतून उमटलेले दिसते. त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांची वेळोवेळी मुखपत्रिकेच्या अंकातून दखल घेतलेली आहे. त्याशिवाय त्यांच्या व्यवस्थापन क्षेत्रांतील व्यवसायावर आधारित विषयांवरही त्यांची बरीच पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांतील काहींना संदर्भमूल्यही आहे. बऱ्याच कंपन्यांतून त्यांना व्याख्यान देण्यासाठी व अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देऊन मार्गदर्शन करण्यासाठी आमंत्रित करण्यात येत असे.

त्यांचे सामाजिक कार्यही कौतुकास्पद आहे. पुण्यातील ज्या 'अथश्री' या संकुलात ते राहतात तेथील घरकाम करणाऱ्या अशिक्षीत महिलांसाठी संध्याकाळच्या त्यांच्या रिकाम्या वेळेत ते साक्षरता वर्ग घेत असत एवढेच नव्हे तर त्यांच्याकडून त्यांनी गायत्रीमंत्र ही पाठ करुन घेतले! हे कार्य त्यांनी वयाची नव्वदी ओलांडल्यावर केले. आपल्या ज्ञातीतील १० वी ते १२ वीच्या वर्गांतील अनेक गरजू विद्यार्थ्यांना त्यांनी भरपूर साहाय्य केलेले आहे व अजूनही करतात. त्यांची पध्दत म्हणजे साहाय्य देण्यापूर्वी ते विद्यार्थ्यांशीच नव्हे तर त्यांच्या पालकांशी चर्चा करतात, योग्य ते मार्गदर्शन करतात, व ठराविक कालावधीनंतर प्रगतीचा पाठपुरावा ही करतात. एका विधवा मध्यमवयीन महिलेच्या नी रिप्लेसमेंटच्या खर्चाचा संपूर्ण बोजा त्यांनी उचलला एवढेच नव्हे तर एक निष्णात अस्थिरोगतज्ञ मिळवून दिला. शस्त्रक्रियेनंतर आवश्यक असलेल्या व्यायामाची व तिच्या प्रकृतीच्या सुधारणेची ते सतत चौकशी करतात. किती हे डोळस समाजकार्य ? संबंधित महिला म्हणजे स्वरुप वागळे हिचा गायतोंडेविषयी लिहिलेला कृतज्ञतेचा लेख याच अंकात 'प्रतिक्रिया' या सदरांत आलेला आहे.

श्री. गायतोंडे यांना शंभरी गाठेपर्यंत तरी निरोगी व सुदृढ आयुष्य लाभो व त्यांच्याकडून दर्जेदार लेखन व बहुआयामी समाजकार्य घडवून आणो अशी त्यांची निस्सीम श्रध्दा असलेली कुलदेवता श्री शांतादुर्गा हिच्या चरणी प्रार्थना.

### गुंतागुंतीच्या यशस्वी शस्त्रक्रियेमध्ये डॉ. सुनील नाडकर्णी यांचा सहभाग

मणक्याची एक गुंतागुंतीची शस्त्रक्रिया करण्यांत पुण्यातील वैद्यकीय तज्ज्ञांना अलीकडे यश आलेले आहे. मणक्याची एकदा शस्त्रक्रिया झाल्यानंतर पुन्हा शस्त्रक्रिया करण्याचे आव्हान डॉक्टरांपुढे होते. प्राईम सर्जिकल सेंटर येथील डॉ. सतीश गोरे यांनी डॉ. सुनील नाडकर्णी यांच्या सहकार्याने ही शस्त्रक्रिया केली. व त्याचे वृत्त दैनिक 'सकाळ' मध्ये छापून आले होते. एका रुग्णाची पारंपरिक पध्दतीने मणक्याची शस्त्रक्रिया केली गेली होती, पण नंतरही रुग्णाला तीव्र वेदना होत होत्या. मणक्यावर पुन्हा शस्त्रक्रिया करण्याचे आव्हान डॉक्टरांपुढे होते. मज्जारजूला शस्त्रक्रियेदरम्यान धक्का लागू नये यासाठी विशिष्ठ प्रकारच्या नळीच्या माध्यमातून त्याच्यावर कवच तयार केले गेले. त्यांमुळे शस्त्रक्रियेला अडथळा झाला नाही. या पध्दतीत रुग्णाला रक्त देण्याची गरज भासत नाही. लेझरचा उपयोग करुन मणक्याचा नसा अचूकपणे सोडविणे शक्य झाले. अत्यंत गुंतागुंतीची ही शस्त्रक्रिया आता वेदनारहित झाली आहे. त्यातून रुग्ण अगदी कमी वेळेत पूर्ववत होतो.

डॉ. सुनील मनोहर नाडकर्णी हे सदाशिवगडच्या परिसरात सर्वांना परिचित असलेले गणपत मास्तर यांचे नातू. पुण्याहून ऑर्थोपेडिक्स विषयांत एम.एस.ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर

विलायतेतून एफ. आर. सी. एस. ची परीक्षा ते उत्तीर्ण झाले व नंतर एम.सी.एच. ही सुपर स्पेशॅलिटीच्या परीक्षेतही त्यांनी यश प्राप्त केले. पुण्यांतील निष्णात अस्थिरोगतज्ज्ञांमध्ये त्यांची गणना केली जाते. विशेषत: मणक्याच्या शस्त्रक्रियेमध्ये त्यांचा हातखंडा आहे. त्यासाठी संचेती, दीनानाथ, ससून इत्यादी इस्पितळांमधून त्यांना पाचारण करण्यात येते. विनम्र स्वभाव, हंसतमुख चेहरा, रुग्णाला त्याच्याच भाषेत विश्वासात घेऊन उपचार समजविण्याची हातोटी, पारदर्शी व्यवहार यामुळे ते फार लोकप्रिय आहेत.

डॉ. नाडकर्णी यांचे खरे मौलिक समाजकार्य म्हणजे देरवण इथले. देरवण हे गांव चिपळूण जवळ आहे. पुण्याहून सुमारे पाच तासाचा ड्राईव्ह. त्या गांवातली एका माळरानाची जागा श्री स्वामी समर्थ भक्त श्री. वालावलकर या मुंबई येथील धनिकाने निवडली व तेथे ग्रामीण रुग्णांसाठी अत्यंत आधुनिक उपकरणांनी सुसज्ज असलेले व सर्व सुविधा असलेले एक हॉस्पिटल स्थापन केले. डॉ. नाडकर्णी दर शनिवार–रविवार न चुकता तेथे जातात व विनामूल्य गरीब रुग्णांची सेवा करतात. त्यांचे हे व्रत गेल्या दहावर्षांपासून चालू आहे. या त्यांच्या समाजसेवेला तोड नाही. देरवणच्या परिसरांतील गांवकऱ्यांना डॉ. नाडकर्णी देवतुल्य आहेत.

### 'विवाह – संस्कार का करार ?'
### वागळे यांच्या लेखाचे एका विशेषांकात पुनर्प्रकाशन

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात छापून आलेल्या 'विवाह–संस्कार का करार ?' या निबंधाचे लेखक श्री. शंकर वागळे यांचे शिक्षण पुण्यांत झालेले आहे. अधुनमधुन त्यांचे वास्तव्य पुण्याला असते. तेव्हां ते संभाजी उद्यानात सर्व मित्रमंडळींच्या घोळक्यात सामील होतात. एकदा या कंपूला त्यांनी वरील लेख खुमासदार पध्दतीने वाचून दाखविला. त्या लेखाला इतका उत्तम प्रतिसाद मिळाला की त्यांनी तो लेख एखाद्या स्थानिक अंकात प्रसिध्द करण्याची त्यांना गळ घातली. १ ऑक्टोबर हा ज्येष्ठ नागरिक दिन म्हणून साजरा केला जातो. त्याचे औचित्य साधून ज्येष्ठ नागरिक महासंघ, पिंपरी, चिंचवड, यांनी 'ज्येष्ठ नागरिक दिन विशेषांक' त्या दिवशी प्रकाशित केला. त्या विशेषांकात सदर लेख अंतर्भूत करण्यात आलेला आहे.

### डॉ. अविनाश वागळे यांची इंडियन मेडिकल असोसिएशनच्या ठाणे शाखेच्या अध्यक्षपदी निवड

डॉ. अविनाश गोपाळ वागळे, ठाणे, हे तेथील एक प्रख्यात बालरोगतज्ज्ञ. इंडियन मेडिकल असोसिएशन या संस्थेच्या ठाणे शाखेच्या अध्यक्षपदी २०१३–२०१५ या दोन वर्षांच्या कालावधीसाठी ते निवडून आलेले आहेत. त्या आधी सेक्रेटरी या पदावर असतांना त्यांना त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल राज्यस्तरीय 'बेस्ट सेक्रेटरी अवॉर्ड' मिळालेला होता.

# स्पृहणीय यश

**कु. निओमी अतुल कसबेकर :** 'केम्ब्रीज इंटरनॅशनल एक्झामिनेशन' तर्फे जगभरांतल्या १०वी, ११वी, १२वी या कक्षांतल्या विद्यार्थ्यांसाठी गणित, भुगोल, फिझिक्स इत्यादी विषयांमध्ये विद्यार्थ्यांमधील सखोल ज्ञानाची परीक्षा घेतली जाते. कु. निओमी ही हिल स्प्रिंग इंटरनॅशनल या शाळेत १० वीत असतांना तिने या परिक्षेत भुगोल या विषयांत 'इंडिया टॉपर' असे स्पृहणीय यश संपादन केले. ती सध्या सोमाणी इंटरनॅशनल स्कूलमध्ये ११वीत आहे. 'हार्वर्ड मॉडेल युनो' यांच्या अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी 'मॉक' चर्चा भरविण्यांत येते. एकदा ही चर्चा चीनमध्ये भरविली होती तेव्हां तिने चीनचे प्रतिनिधित्व केले व तिला दोन बक्षिसे मिळाली. हैदराबादमध्ये ही चर्चा भरविली गेली तेव्हां तिने जर्मनीचे प्रतिनिधित्व केले. ती उत्तम फुटबॉलपटु असून कॉलेजटीममधून गोलकीपर म्हणून खेळते.

**कु. रमांगी पद्मज आरस :** प्रभादेवी येथील श्री. पद्मज रमाकांत आरस यांची कन्या कु. रमांगी ही के. ई. एम. ची विद्यार्थिनी यंदा ती Bachelor of Occupational Therapy(B.O.Th) या परीक्षेत महाराष्ट्रांत पहिल्या क्रमांकाने उतीर्ण झाली.

**कु. दक्षा प्रसन्न तेलंग :** उदयपूर येथील श्री. प्रसन्न माधव तेलंग यांची कन्या व दादर येथील श्री. माधव भवानीराव तेलंग यांची नात कु. दक्षा ही दिल्ली बोर्डाच्या सी. बी. एस. ई. या शालांत परीक्षेत उदयपूर येथील दिल्ली पब्लिक स्कूलमधून प्रथम क्रमांकाने उतीर्ण झाली.

**कु. सुज्ञा मकरंद देसाई :** आपल्या संघाच्या कार्यकारिणीचे माजी सभासद विक्रोळी येथील श्री ध्रुवकांत देसाई यांची नात कु. सुज्ञा मकरंद देसाई ही दत्ता मेघे इंजिनिअरींग कॉलेज, ऐरोळी, येथील विद्यार्थिनी. ती यंदा मुंबई विद्यापीठांत केमिकल इंजिनिअरींगच्या पदवी परीक्षेत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली.

**कु. नुपुर सुनिल प्रभु :** अंधेरी येथील श्री. निशिकांत लजपत नाडकर्णी यांची नात कु. नुपुर प्रभु ही नेरुळ येथील एस्. आय. ई. एस्. स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी येथील विद्यार्थिनी. ती यंदा बी. ई. (बायोटेक्नोलॉजी) या पदवी परीक्षेत मुंबई विद्यापीठांतून द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली.

# प्रतिक्रिया

## गांधीवादी श्री. वसंत दिवेकर

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात माझा मोठा भाऊ वसंत दिवेकर याच्याविषयी 'प्रकाशझोत' या सदरात काही मजकूर प्रसिध्द झाला होता. त्या संदर्भात त्याच्या सेवाभावी कार्याविषयी वाचकांना आणखी माहिती असावी म्हणून हा पत्र प्रपंच.

सुप्रसिध्द प्रसुतीतज्ज्ञ डॉ. एम्. आर. दिवेकर हे आमचे काका, ते स्वातंत्र्यसैनिकही होते. काकामुळेच वसंतला राष्ट्रप्रेम, दर्जेदार इंग्लीश साहित्य, सामाजिक बांधिलकी याचे बाळकडू मिळाले. त्यापैकी एक फळ म्हणजे वसंतच्या मनांत बिंबले आहे की भारत हा शहरांत नसून ग्रामीण भागांत आहे. म्हणून मागासलेल्या ग्रामीण भागांतील जनतेच्या जीवनशैलीत सुधारणा घडवून आणण्याचा त्याने ध्यास घेतला. मुखपत्रिकेच्या अंकात लिहिलेल्या त्याच्या सेवाभावी कार्याच्या अनुषंगाने एक घटना नमूद करावीशी वाटते.

वसंतला कर्करोग झाला तेव्हां तो पुण्याच्या दीनानाथ इस्पितळात असतांना सुदैवाने धनगर समाजातील गणेश कारे पाटील हा तरुण सेवेकरी वसंतच्या कुटुंबाचा एक घटकच झाला. बुध्दिमान, प्रामाणिक, कष्टाळू व विश्वासू अशा गणेशाने वसंतची अनेक वर्षे निष्ठेने देखभाल केली. कालांतराने वसंत इस्पितळातून हडपसर येथील अथश्री येथे राहावयास गेला. तेथेही गणेश वसंताच्या सोबत आहे. एकदा गणेशने त्याचे मामा पांडा हाके याची वसंतशी गाठ घालून दिली. गावच्या परिस्थितीसंबधी थोडी चर्चा झाल्यावर वसंतने पांडाला त्याच्या उजनी धरणाजवळ सहा हेक्टर क्षेत्रफळ असलेला पण बुजलेला एक तलाव पुन्हा कार्यान्वित करण्याचा सल्ला दिला व तंत्रही सांगितले आणि आश्चर्याचा सुखद धक्का म्हणजे पहिल्याच पावसाळयांत तो तलाव पूर्वपदावर आला. पांडाने तेथे तीसहून अधिक पंप्स बसविले. आता तो दुष्काळी कोरडा भाग भाजीपाल्यांच्या मळ्यांनी हिरवागार झालेला आहे. तिथल्या जमिनीची किंमत आता दहापटीने वधारलेली आहे. या यशाने प्रेरित होऊन अनेक गांवकरी बुजलेले एकेक तलाव पुनर्विकसित करीत आहेत. हे तंत्र आता जवळच्या परिसरांत एवढे रुजलेले आहे की, आतापर्यंत लहानमोठे जवळजवळ सहा हजार निरुपयोगी झालेले तलाव परत वापरांत आलेले आहेत व एक प्रकारची हरित क्रांतीच झालेली आहे.

नव्वदीतल्या कर्करोगग्रस्त वसंतने लावलेल्या एका छोट्या रोपट्याचे आता प्रचंड वृक्षांत रुपांतर झाले ही घटना खरोखरच कौतुकास्पद आहे.

**अशोक दिवेकर, पुणे.**

## रा. सा. जगन्नाथराव मुझुमदार यांचा कराचीतील सत्काराचा फोटो

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात रा. सा. जगन्नाथराव मुझुमदार हे १९४१ साली कराची येथे नोकरींतून निवृत झाले तेव्हांचा फोटो बघून माझ्याही कांही सुखद स्मृती जागृत झाल्या. मी १९३७ ते ४२ या दरम्यान तेथे होतो. माझ्या दोन्ही बहिणी सुधा व शीला यांचा जन्म कराचीतलाच. माझ्या सिंधी मित्रांना मी 'नाडकरानी' म्हणूनच माझी ओळख करुन देतो! त्या फोटोमध्ये माझी आत्या व त्यांचे यजमान पुतुराव गायतोंडे हेही दिसतात. आपल्या मुखपत्रिकेचे वडिल भावंड म्हणजे 'शारदा'. शारदेच्या ऑक्टोबर १९३८ च्या अंकात पृ. ११० वर पुढील उल्लेख आढळतो. "श्री. पि. बी. गायतोंडे यांनी कराची येथे घर बांधले असून श्री. गायतोंडे हे कराची येथे घर बांधणारे ज्ञातीतील पहिलेच गृहस्थ होत." त्यावेळी अशा घटनांचे कौतुक असे. कराची येथील आपले ज्ञातिबांधव तेथील सर्वांत चांगली मराठी शाळा एन्. जे. वैद्य या शाळेत जात हे एन्. जे. वैद्य म्हणजे हुतात्मा जनरल अरुणकुमार वैद्य यांचे पिताश्री होत. आपल्यापैकी कराची येथे ज्यांचे वास्तव्य झालेले आहे त्यापैकी सुमारे वीसजण अद्याप हयात आहेत. त्यातील सर्वांत जेष्ठ म्हणजे ९५ वर्षाचे दुर्गानंद गायतोंडे.

१९४० मध्ये दिल्ली येथील बृहन्महाराष्ट्र परिषदेतर्फे कराची येथे एक परिषद भरविण्याचे ठरविले तेव्हां स्थानिक समितीत फोटोत दिसणारे व नंतर माटुंग्याच्या कर्नाटक बिल्डिंगमध्ये राहणारे विनायक नारायण सुखरणकर हे खजिनदार होते.

मागे आपल्या एज्युकेशन सोसायटीतर्फे दिवाळी फंड गोळा करण्यासाठी कारवार, अंकोला, सदाशिवगड येथे स्थानिक समित्या होत्या. कराचीमध्येही एक समिती कार्यरत होती व या समितीतर्फे दरवर्षी निधी गोळा केला जात असे.

जगन्नाथरावांविषयी सांगायचे म्हणजे ते सर्वांचा आधार होते. एक उदाहरण म्हणजे फोटोत दिसणाऱ्या शांताबाई (सुबी) वागळे यांच्या यजमानाना अचानक इस्पितळात दाखल करावे लागले. त्यावेळी जगन्नाथराव रोज इस्पितळात जाऊन वागळे कुटुंबियांची देखभाल करीत. थोड्याच दिवसात श्री. वागळे यांचे निधन झाले तेव्हां शांताबाई व त्यांची दोन लहान मुले सिध्दानंद व उषा यांना काही दिवस जगन्नाथरावांनीच आश्रय दिला होता.

कराची येथे शंभर वर्षापासून सारस्वत समाज स्थानिक झाला होता. १९१५ साली 'दक्षिणात्य गौड सारस्वत ब्राह्मण समाज' ही संस्था स्थापन करण्यात आली. १९४० साली या संस्थेचा रौप्य महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला त्यावेळी जगन्नाथरावच संस्थेचे अध्यक्ष होते.

जगन्नाथराव यांचे एक पुत्र मोहन याचे बालवयातच निधन झाले होते. तेव्हा त्यांनी आपल्या एज्युकेशन सोसायटीला दोनशे रुपये (त्यावेळचे) देऊन दरवर्षी ज्ञातीतील एका हुशार विद्यार्थ्याला 'मोहन प्राईझ' देण्याची व्यवस्था केली होती.

**द. ना. नाडकर्णी, पारले.**

## देवतुल्य श्री. दुर्गानंद गायतोंडे यांचे जाहीर आभार

मुखपत्रिकेच्या एप्रिल २०१३ च्या अंकात पुण्याचे श्री. दुर्गानंद गायतोंडे यांनी ज्ञातीतील गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्य देण्याची इच्छा व्यक्त केली होती. व संबंधितांकडून अर्ज मागविले होते. त्यानुसार कॉलेजमध्ये शिकणाऱ्या माझ्या दोन मुलांसाठी मी त्यांच्याशी संपर्क साधला. श्री. गायतोंडे मुंबईत आल्यावेळी त्यांनी आम्हांला त्यांच्याकडे बोलावले. माझी कठीण शारीरिक परिस्थिती बघून मुलांपेक्षा मलाच साहाय्याची जास्त गरज आहे अशी त्यांना खात्री वाटली. कारण गुडघ्याच्या दुखण्यामुळे माझे दोन्ही पाय निकामी झाले होते व मला धड चालताही येत नव्हते. पतीच्या अकाली निधनामुळे माझ्याजवळ काहींच आर्थिक ताकद नव्हती व मनुष्यबळही नव्हते. माझा जीव अक्षरश: रडकुंडीला आला होता.

माझी ही दयनीय अवस्था पाहून श्री. गायतोंडे यांनी दोन्ही पायांच्या Knee replacement चा सुमारे दीड लाखाचा खर्च स्वत: होऊन उचलला. एवढेच नव्हे तर ही शस्त्रक्रिया मुंबईचे निष्णात अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. नंदकुमार लाड यांच्याकडून करुन घेतली. या कामांत श्री. गायतोंडे यांचे जावई व भारतातले अग्रगण्य रेडियॉलॉजिस्ट डॉ. मुकुंद जोशी यांनी त्यांच्या धकाधकीच्या दिनचर्येतून वेळातवेळ काढून डॉ. लाड यांची भेट घेऊन शस्त्रक्रियेची तारीख मिळवून देण्यापर्यंत बरेच परिश्रम घेतले. श्री. गायतोंडे सुध्दा स्वत: सर्वांच्या संपर्कात असत. आता माझी शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण झाली आहे व फिजियोथेरेपिस्टच्या मार्गदर्शनाखाली मी लवकरच पूर्ववत चालू शकेन असा मला विश्वास वाटतो.

यापुढे प्रत्येक पाऊल टाकतांना या तीनही देवतुल्य सद्गृहस्थांची मला आठवण होईल व मी त्यांची कायमची ऋणी राहीन.

**स्वरुप नीलेश वागळे, सांताक्रुज (प.)**

## दीपक बोरकर - आठवणीतला

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात राजू बोरकर यांचा कै. दीपक बोरकरबद्दलचा एक मृत्युलेख वाचनांत आला तेव्हां माझ्याही दीपक संबंधीच्या काही स्मृती जागृत झाल्या व त्या लिहून मन हलके करावे असे वाटले.

दीपकची आणि माझी पहिली भेट ग्रँट रोड जवळील कॉंग्रेस हाऊस समोरील गोखले हायस्कूलमधली, सहावीपर्यंतचे शिक्षण सदाशिवगडहून संपवून मी मुंबईला आलो होतो. दीपक पण त्याच शाळेत शिकत होता. आम्ही मधल्या सुट्टीमध्ये वा शाळा सुटल्यानंतर भेटत असू. दीपक शाळेत एक शिस्तीचा अभ्यासू व हुषार विद्यार्थी म्हणून सगळयांना परिचित होता. आपापल्या तुकडयातून आम्ही पहिले येत असू. तरी संपूर्ण इयत्तेत तोच नेहमी पहिला असायचा आणि हा नेम त्याने शालान्त परीक्षेपर्यंत चुकू दिला नव्हता. त्या वयातदेखील त्याचे मराठी

भाषेवरील प्रभुत्व आणि प्रगल्भता वाखाणण्याजोगी होती. अक्षर तर एवढे सुवाच्च की त्याने लिहिलेले निबंध सर्व वर्गांतून वाचून आणि दाखवून शिक्षकवर्ग इतरांना त्याचे उदाहरण म्हणून द्यायचे.

दीपक उंचीने बुटका होता पण एकंदर परिस्थिती पाहता 'मूर्ती लहान पण कीर्ती महान' असेच म्हणायला पाहिजे शालान्त परीक्षेनंतर पुढील शिक्षणासाठी आम्ही वेगवेगळया महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि आमची ताटातूट झाली नोकरी निमित्त मी वीसेक वर्षे महाराष्ट्राच्या बाहेर राहिल्याने बरीच वर्षे आमची भेट होत नव्हती. तीनचार वर्षांपूर्वी संघाच्या कार्यकारिणींत दाखल झाल्यानंतर संघाच्या आणि मुंबई व ठाणे मंचाच्या विविध कार्यक्रमांत आम्ही भेटत राहिलो. तेव्हा एका गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे तो उत्तम गायकही होता.. हा त्याचा सुप्त गुण आम्ही शाळेत असतांना कधीच जाणवला नाही. कारण तेव्हां तो फक्त अभ्यासू म्हणूनच ओळखला जात असे. विविध कार्यक्रमांत त्याची इतरांना उत्तेजन देण्याची आणि सर्व लहानमोठयाशी मिळून मिसळून वागायची वृत्ती त्याच्या सहृदयपणाची साक्ष होती. अशा सहृदयी मित्राच्या आत्म्यास शांती लाभो हीच प्रार्थना.

**शिरीष दीनानाथ वाघ, बोरीवली.**

## मुंबई मंच – कारवारी मेळाव्याचे आमंत्रण

'**कारवारी खाद्यमेळाव्याला**' दरवर्षी मिळणाऱ्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे स्फूर्ती घेऊन यंदाही एक 'आनंद मेळावा' भरविण्यात येत आहे. पाककृतीशिवाय ज्यांना आपण बनविलेल्या वस्तू किंवा पदार्थ विक्रीसाठी किंवा प्रदर्शनासाठी ठेवायचे असतील, व ज्यांना बालगोपाळासाठी करमणुकीचे खेळ आयोजित करावयाचे असतील त्यांनाही गाळा मिळेल. इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा.

**तारीख व समय** : रविवार १ डिसेंबर २०१३ संध्याकाळी ५.०० ते ९.००
**कार्यस्थळ** : सरस्वती बाग, जोगश्वरी, के.जी एस. सोसायटी पटांगण
**आकार** : रु. ७०० एका गाळयासाठी
**संपर्क** : गाळा आरक्षणासाठी व पाककृती ठरविण्यासाठी.

**प्रसाद गायतोंडे : ९८१९४११३३७ रसिका गायतोंडे : ९९६९७४४४०१**

**संपर्कासाठी अंतिम तारीख : २४ नोव्हेंबर २०१३.**

प्रथम नोंदणी करणाऱ्यास प्राधान्य
किस्मूर, एरप्पे, सुकरुंडे, हीट, पातोळी इत्यादींवर ताव मारण्यासाठी
सर्वांनी मोठया संख्येने हजर राहावे.

# ठाणे मंचाचो अनुभव ट्रॅव्हल्समार्फत कोस्टल कर्नाटकाचो अविस्मरणीय अनुभव

ठाणे मंचान आयोजित केल्ली अरुण भट हांगेली अनुभव ट्रॅव्हल्सच्या कोस्टल कर्नाटकाची सात दिसाची सहल म्हळ्यार एक अविस्मरणीय अनुभव! मनशाक जग फिर्न आयलो तरी स्वत:च्या मूळगांवची ओढ ही अगदी भितरल्यान उरताच! आमगेलो जन्म मुंबैत गेलो तरी आमगल्या पूर्वजांल्या कर्मभूमीचे, जन्मभूमी बद्दल आमकाबी अपूरबाय आसाच, आणि पयल्यावरी काईच रावले ना अशे कोणीबी, कितलेही म्हळे तरी आमगेले कारवार आणि आजुबाजुचो परिसर सुरेखच आसा.

तर आमी २१ सप्टेंबराक मुंबैच्यान भायर पडली आणि २२ तारखेक फालफाल्यार कारवाराक पावली. आयतार म्हळ्यार सातेबाजारोचे दिस! म्हळयार पर्वणीच! सगळ्याकच हें घेऊं की तें जाले पण पुढचो सगळो प्रवास आशिल्यान मर्यादो पडल्यो. सातेबाजारान् डोळ्याबरोबरच नाकाक बी सुख दिले, अस्सल कारवारकाराक सुक्या नुस्त्यापुढे खंचोही सुवास फिकीच दिसता. थंच्या श्री. अरुण कुलकर्णी हाणी आग्रहान आमका तांगेल्या घरा व्हेले. श्री शांतादुर्गेची मुर्ती आणि तिजी सगळी व्यवस्था पळौन आमका कवळ्याच्या शांतादुर्गाकडे गेल्यावरी जाले. ताणे आमगेली सागर सफारीची जबाबदारी प्रेमान स्वत:कडे घेतली आणि ताजेखातेर कष्ट बी खुप घेतले.आमका सगळ्यांकच देवगड, कुर्मगड, मदलींगगड आणि देवबाग बोटीतल्यान पळौच्याक खूप मजा आयली. वेळ नाशिल्यान गडाचेर वच्चाक मेळ्ळेना. समुद्रात डॉल्फीनान आमका भेट दिली. सांजेमायतार काई जण आपापल्या सोयऱ्यांक मेळच्या गेली, तर काईजण सदाशिवगडावैले देऊळ आणि परिसर पळौन आयली. त्याच राती आमी श्री. अरुण भटाल्या शिरसीतल्या 'ग्रीन वर्ल्ड' या फार्महाऊसाचेर पावली श्री. भट म्हळ्यार अपुरबाय करतलो मनीस आमी कारवारा पाय दवरलपासुन आमी ट्रॅव्हल कंपनीतल्यान न्हय तर आमगेल्याच सोयऱ्याल्याच घरां गेल्यात असो अनुभव ताणी आमका दिलो. शिरसीत आमी चार राती आणि तीन दिस आशिल्ली. या तीन दिसात आमी याना, म्हळयार ज्वालामुखीचे एक सुंदर नैसर्गिक शिल्प तशेच मरिकांबामातेले प्राचीन, सुंदर अशे देवूळ, आद्य शंकराचार्यालो शृंगेरी मठ, सूर्यनारायणाचे देवूळ, गणपतीदेवूळ, गिरसप्पा धबधबो हे पळैलेच, पुण सगळ्यात सुंदर शाल्मली नदीतले सहस्र लींग आणि ताजेपुढचे कोरीव नंदी, दुसरे अघ्नाशिनी (पाप नाश करतली) नदीवैलो उच्छळ्ळी धबधबो हाजे बी दर्शन घेतले! हो निसर्गाच्या कुशीतलो अप्रतिम धबधबो! आमगेल्यापैकी नायगारा वचुन आईल्या काईजणान तर नायगाराचेर सोयी केल्यात तशे हांगा केल्यार हो बी तोडीसतोड जातलो अशे म्हळे! आसू!

शिरसीतल्या आमगेल्या मुक्कामात पर्यटकापैकी काईजणान एक दिस आपली कला सादर केली तर एक दिस श्री. अरुण भट हाणी श्री. श्रीधर हेगडे, हांगेले गायन दवरील्ले. ताणे सूरसम्राट भीमसेन जोशी वरी गीत म्हण्ण, मन आणि कान तृप्त केले.

शिरसीत देवळां बरोबरच निसर्गसौंदर्य सुध्दा भरपूर आसा. हिरवीगार शेतां, साग, नारळ सुपारीचो बागां हे पळौन बरें दिसले. कर्नाटकाचो मूळमंत्र Nature is treasure, save it for pleasure. आमी तीनचार खेपेक मोर पळैले, कोल्हे, माकडा बी पळौच्याक मेळ्ळी.

शिरसी सोडले नंतर आमी गोकर्ण–महाबळेश्वर, अंकोल्याची नागी म्हामाय, आर्यादुर्गा, इडगुंजीचो गणपती ह्या देवस्थानाक भेट दित दित सांजेमायत्यार मुर्डेश्वर पावली. श्री मुर्डेश्वराच्या प्राचीन देवळातली थोडी वेगळी आरती पळौच्याक मेळ्ळी. मुर्डेश्वराच्या भव्य गोपुरातल्या १८ व्या मजल्यावैल्यान आजुबाजुची परिसर पळौच्याक मजा आयली थंच्या भव्य १२१ फूट उंच अशा शंकरामुर्ती सकल गुहेत रावणाली काणी मुर्तीस्वरुपात पळौच्याक मेळ्ळी.

कारवारात पाय दवरलेपासुन ते मुर्डेश्वर सोडेपर्यंत श्री. अरुण भट हांणी आमगेल्या जीभेचे जे लाड केले ते किते सांगू? नुस्त्याचे प्रकार म्हणनाकात, गोडधोडाचे प्रकार म्हणनाकात, जीभ, मन, तृप्त जाले आणि हाका जोड आशिल्ली ती तांगेली आणि तांगेल्या मनशाल्या आपलेपणाची आणि मायेस्तपणाची. मुर्डेश्वरात खाल्ले बांगडया धोडक आणि चिबडा फोव खावन जुनी याद (सय) येवन काई लोकांलो गळो भन्न आयलो.

मुर्डेश्वरानंतर आमी चित्रापुर मठाक वचुन आयली. मठालागुनची श्रीमत् परिज्ञानाश्रम वस्तु संग्रहालयांक भेट दिली. अतिशय सुंदर जतन केल्ले हे संग्रहालय आसा. थंच्या एका पोईंटाक वचुन आमी त्रासी नदी आणि अरबी समुद्राचे दर्शन घेतले. नंतर सोमेश्वर बीचार वचुन समुद्रस्नानाचो आनंद घेतलो. आमगेल्यातली सगळ्यात वयस्क जोडपी सुध्दा तरुण जाली. राती आमी कुंदापुर रावली.

सकाळी आमी अनेगुडी (हत्तीलो डोंगर) ह्या देवळात गेली हे कुंभसी गावात आसा आणि कुंभासर राक्षस आणि भीमाली काणी मुर्तीरुपात पळौच्याक मेळ्ळी. थंच्यान उडुपीच्या भव्य श्रीकृष्णाल्या मंदिराक भेट दिली. ताजी बी कनकदास ह्या संताली एक काणी आयकुच्याक मेळ्ळी.

ठाणे मंचाचे कारवार सहल कर्ची अशे एक स्वप्न आशिल्ले हे स्वप्न पूर्ण कर्ची जबाबदारी घेतली ती श्री. अरुणदादा कसबेकरान् अरुण भटाल्या मैत्रीचो फायदो ताणे ठाणे मंचाक दिलो. या दिलदार मनशान आणि तांगेली घरकान्न प्रभावैनी दोघांनी आमचे बरोबर रावन आमका साथ दिली. श्री. अरुण कसबेकर, श्री. अरुण कुलकर्णी आणि श्री. अरुण भट या तीन अरुणांनी आमगेले स्वप्न पूर्ण केले.

**विशेष आभार :** श्री. सुरेश पालेकर, लता नायर, श्री.गिरीश रेगे, श्री. विजय कामत.

**मंजिरी मनोज कुलकर्णी, ठाणे**

## वार्षिक कवळेंमठ संस्कृत पाठांतर स्पर्धेचे विजेते

कैवल्यपूर मठाधीशांच्या आशीर्वादाने यंदाही २२ सप्टेंबर रोजी विद्यार्थ्यांसाठी संस्कृत पाठांतर स्पर्धा घेण्यांत आली.

सर्वप्रथम संघाचे अध्यक्ष श्री. प्रेमानंद नाडकर्णी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाले. सुरवातीला ज्ञातीतील एक उत्साही कार्यकर्ते श्री. संजय नाडकर्णी, माहीम, यांचे नुकतेच अकस्मात निधन झाले होते त्यांना एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष श्री. देवदास नाडकर्णी यांनी आदरांजली वाहिली व दोन मिनिटाची स्तब्धता पाळण्यांत आली. नंतर संघाचे कार्यवाह श्री. सुभाष कसबेकर यांनी स्पर्धेचे उद्दिष्ट व पाठांतरासाठी गुण देण्याचे निकष विशद करुन सांगितले. त्या पश्चात मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात नमूद केल्याप्रमाणे शिशु व कुमार गटातल्या स्पर्धकांचे श्लोकपठण झाले. मध्यंतरानंतर सर्व स्पर्धकांना भेटवस्तू देण्यांत आल्या. निकाल जाहीर करण्यापूर्वी परीक्षकांतर्फे श्रीमती उज्जला पवार यांनी स्पर्धकांना योग्य ते मार्गदर्शन केले. श्री. सुभाष कसबेकर यांनी स्पर्धेचे उत्कृष्टपणे सूत्र संचालन केले.

### विजेत्याची नावे

**शिशुगट (६ वर्षाखालील)**

१. अयान गिरीश तेलंग, माहीम *

**शिशुगट (६ वर्षावरील)**

१. ऋतुजा मंगेश धुमे, दादर *
२. प्रियांका गिरीश दळवी, ठाणे
३. कोहना राहूल पिकळे, अंधेरी

**कुमार गट**

१. अमेय मंदार पंडित, पारले **
२. अमेय उल्हास नेत्रावळी, पारले

**विशेष पारितोषिक :** आदित्य उल्हास नेत्रावळी, पारले

* दिनकर लक्ष्मण कुलकर्णी स्मृतीप्रीत्यर्थ ठेवलेली पारितोषिके या विजेत्यांना मिळाली.
** आनंद गणपती वर्टी स्मृतीप्रीत्यर्थ ठेवलेले पारितोषिक या विजेत्याला मिळाले.


**CROSHA PURSES AVAILABLE**
READY-MADE AND MADE TO ORDER
Contact : SMT Mangala Jangam (Wagle) - 8976413188
L 4/13, Laxmi Romana, Bangur Nagar,
Goregaon (West), Mumbai - 400 090.



# ठाणे मंचचा कोस्टल कर्नाटक सहलीचा ग्रुप फोटो

**स्थळ : मुर्डेश्वर** **दिनांक : २७ सप्टेंबर २०१३**

**समोरील रांग :** १.अनघा वागळे २. सुधा दळवी ३. सुरेखा पालेकर ४. शुभांगी वागळे ५. दीपा मुझुमदार ६. प्रभा कसबेकर ७. लता नायर ८. शैला लाड. ९. शिवांगी नाडकर्णी १०. अपर्णा बोरकर ११. स्मिता रेगे १२. मंगला वागळे.

**मधली रांग :** १. आनंद वागळे. २. मारुति दळवी. ३. सुरेश पालेकर. ४. अविनाश वागळे. ५. दिलीप मुझुमदार ६. अरुण कसबेकर ७. अरुण भट ८. महारुद्र वागळे ९. जयश्री बोरकर १०. अजित बोरकर

**मागील रांग :** १. चित्रा कामत २. विजय कामत ३. मंजिरी कुलकर्णी ४. गिरीश रेगे ५. सुरेश नाडकर्णी ६. सचिन ७. गुरु ८. रवी

**(फोटोचे प्रायोजन सौजन्य : सौ. चित्रा व श्री. विजय कामत, ठाणे)**


www.kccgoa.in
वीण विश्वासाची, सोबत निसर्गाच्या कुशीची
कुणाल कन्स्ट्रक्शन म्हणजे उत्तम बांधकाम, कल्पक वास्तुशास्त्र आणि सर्वोत्तम सुविधांची विश्वासार्हता. विश्वासाच्या याच विणीतून साकारलेल्या गोव्यातील 'सुखसमृद्धी' संकूलात आजच तुमची वास्तू पक्की करा आणि मग अनुभवा निसर्गाच्या कुशीत नटलेलं तुमचं समृद्ध संपन्न आयुष्य.
प्रदूषणविरहीत अशा वातावरणात राहून तुम्हाला अधिक संपन्न असं मानसिक आणि शारीरिक दीर्घायुष्य अनुभवता येईल यात काही शंकाच नाही.
सोबत मंगेश, म्हाळसा, नृसिंह, नवदुर्गा अशा देव-देवतांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर दीर्घायुष्याचं वरदान ठरेल हे नक्कीच.
सुखसमृद्धी
मंगेशाच्या देवळापासून 2 मिनिटांच्या अंतरावर, मंगेशी, फोंडा- गोवा
देखणा निसर्ग | प्रदूषणमुक्त हवा | उत्कृष्ट बांधकाम | मुबलक पाणीपुरवठा
मंगेशीचा मंगेश, म्हार्दोळची म्हाळसा वेलिंगचा नृसिंह, माडकईची नवदुर्गा अशा अतिशय प्रसिद्ध मंदिरांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर.
फ्लॅटस् उपलब्धः 1 रूम किचन, 1 बी.एच.के, 2 बी.एच.के
प्रॉजेक्ट मान्यताः गोवा टाउन प्लॅनिंग
कर्जसहाय्यः नामवंत वित्त संस्था
a Project by: KCC कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी
मुंबई ऑफिसः श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजुला, सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टेलि:2683 3841/47/72. मोबा: 98336 36451
फॅक्स: 2683 3872 ई-मेल: kunalconstruction@vsnl.net, kunalconstructiongoa@yahoo.in
गोवा ऑफिसः टी- 1, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबा: 98209 33352, 98206 33321
गोवा साईटः 95/1, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

## विवाह /वाङ्निश्चय

| | | |
|---|---|---|
| प्रियांक अतुल करुर, गोवालिया टँक | व | शिल्पा प्रकाश शानभाग, शिर्सी |
| निरंजन मनोहर कामत, जोगेश्वरी | व | पूनम् शशिकांत कुलकर्णी. बोरीवली |

## २०१३-२०१६ कालावधीसाठी नव्या कार्यकारिणी

### एन्.के.जी.एस.बी. संघ

**कार्याध्यक्ष** : प्रेमानंद शं. नाडकर्णी **कार्योपाध्यक्ष** : मारुति वि. दळवी
**कार्यवाह** : मंगेश बा. पालेकर व शिरीष दी. वाघ
**खजिनदार** : देवदास अ. नाडकर्णी व सुभाष दि. कसबेकर
**सभासद** : सुरेश मं. पालेकर, राजीव दि. गायतोंडे, मंगेश ग. गायतोंडे

### ठाणे मंच

**कार्याध्यक्ष** : प्रेमानंद शं. नाडकर्णी **कार्योपाध्यक्ष** : सुरेश मं. पालेकर
**कार्यवाह** : मंजिरी म. कुलकर्णी **खजिनदार** : गिरीश मु. रेगे
**सभासद** : मारुति वि. दळवी, दुर्गादास शं. रेगे, चित्रा वि. कामत

## ठाणे मंच वधूवर सूचक मंडळ: आवाहन

सर्व संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी की सौ. उमा (बेबी) वैष्णव, शिवाजीपार्क, यांनी कांही वैयक्तिक कारणासाठी मंडळाचे काम यापुढे चालविण्याची असमर्थतता व्यक्त केली आहे. तेव्हा दादर ते माहीम या परिसरांतील ज्या व्यक्तींना हे सेवाकार्य करावयाची इच्छा असेल त्यांनी खालील व्यक्तींशी संपर्क साधावा.

**सुरेश पालेकर : ९९६९४५५३७०** **मंजिरी कुलकर्णी: ९६६५०९८११७**


# a-zmarriage.com

***All prospective Brides and Grooms your search for life partners ends here at***

## a-zmarriage.com

*Please Contact :*

***Mrs. Gauri Kamat : 28441487/ 9619454343***

## श्री. विठ्ठलराय भट (कडवाड) यांची कांही गाजलेली पुस्तके

**१. निसर्गाचं नयनरम्य लेणं - कारवार** — रु. १००

(सहलेखक : राजेश दिवेकर)

कारवारच्या अनेक पैलूंवर मान्यवरांचे कोंकणी, मराठी, इंग्रजीतून माहितीपूर्ण लेख. अनेक आकर्षक रंगीत फोटो.

**२. जांबावली ते आंबीवली** — रु. ९०

आत्मचरित्र. कारवार परिसरातील सण-उत्सव, संस्कृती, कला यांचे मनोहारी वर्णन.

**३. गीतांजली** — रु. ५०

कोंकणी कवना, कारवारी कोंकणीतून स्थानिक लोकसंस्कृती आधारित गेय, प्रासादिक व कल्पनारम्य कवना. कोंकणीतल्या जुन्या शब्दांचा चपखल वापर.

**४. पोंवळया माळ** — रु. १६०

कोंकणी कथासंग्रह. कारवारच्या परिसरांत घडलेल्या सत्य व काल्पनिक घटनांवर लिहिलेल्या मनोरंजक कथा

**५. घाण्याचे बैल** — रु. २००

कोंकणी कथासंग्रह जीवनाला अनेक अंगांनी भिडतांना आलेल्या अनुभवांवर आधारित रम्य कथा.

**६. मोर नाचरा हवा** — रु. ७५

२५ ललित लेखांचा संग्रह

**७. सोनफुले** — रु. ७५

२५ ललित लेखांचा संग्रह

**८. नादब्रह्माचे मानकरी** — रु. ६०

कंठसंगीत व वाद्यसंगीत या क्षेत्रांत विश्व मान्यता मिळविलेल्या दिग्गजांची सांगितिक भाषेत लिहिलेली व्यक्तिचित्रे

**संपर्क : श्री. विठ्ठलराय भट**

०९२२३३६५१९९ / ०९२२१३०९७५८

**दूरध्वनीवरुन ऑर्डर दिल्यास आमच्या खर्चाने पुस्तके घरपोच पाठवू.**

# सेवाभावी कै. अरविंद कुलकर्णी - श्रध्दांजली

५ ऑगस्ट २०१३ दुपारी १.१५ वाजता दूरध्वनीची घंटा वाजली. लगेच मी दूरध्वनी उचलला. पलीकडील व्यक्तीने माझ्या 'हॅलो' ह्या आवाजावरुन सरळ मला प्रश्न केला 'अरुण, तुका बातमी कळ्ळी ?' मी नाहीं म्हणालो. "अरे, अरविंद गेलो." मला लगेच समजले कोण अरविंद ते. तरी मी नकळत बोलून गेलो "कोण अरविंद ?" त्यांनी मला सांगितले, "तुगेलो भाव." हा मला फार मोठा धक्का होता. प्रथम विश्वासच बसेना. परंतु स्वत: दत्तात्रय नाडकर्णी सांगतोय म्हटल्यावर बातमी खोटी असण्याचा प्रश्नच नव्हता. फक्त मी विचारले 'केन्ना ?' तर त्यांनी सांगितले, 'आताच, १२.३० वाजतना' त्यानंतर मी माझ्या सर्व नातेवाईकांना दूरध्वनीवरुन ही दु:खद वार्ता कळविली. त्यांच्यापर्यंत ही वार्ता तोपर्यंत पोहोचलेली नव्हती.

अरविंद जयवंत कुलकर्णी जन्मदिवस ३ डिसेंबर १९३५, वय वर्षे ७८, शिक्षण सी.ए. टाटा कंपनीत मोठया हुद्याची नोकरी. परंतु वयाच्या ४० व्या वर्षी समाजसेवेत स्वत:ला झोकून देण्यासाठी ही मानाची नोकरी त्यानें सोडली. स्वत: रतन टाटांनी त्याला राजीनामा मार्गे घेण्यास सांगितले तरी त्यानें स्वेच्छा निवृत्ती स्वीकारली. पुढील ३८ वर्षे संजीवनी नांवाच्या संस्थेतून गरीबांसाठी, सामान्यासाठी वैद्यकीय मदत मिळवून देण्याच्या सतत प्रयत्नात तो असे.

देवावर नितांत श्रध्दा, विशेषत: कुलदेवता, शांतादुर्गेवर. देवावर श्रध्दा तेवढाच मानवता हा धर्म मानायचा तो. अपंग व मंदबुध्दी विद्यार्थ्यांसाठी मुंबई शहरात चालणाऱ्या सर्व शाळांशी त्याचे फार जवळचे संबंध, दरवर्षी १ मे रोजी षण्मुखानंद हॉलमध्ये त्या मुलांचे विविध मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात त्याचा पुढाकार असायचा. एकदां आम्हां उभयतांस ह्या कार्यक्रमास त्याच्या आग्रहावरुन उपस्थित राहण्याचा योग आला होता. अनेक वर्षे झाली तरी त्या दुर्बळ घटकांतील मुलातील विविध पैलू व त्यांनीं सादर केलेली नृत्ये आम्ही विसरु शकत नाही. फक्त अरविंदभाऊमुळे आम्हांस ही संधी लाभली.

आमचे 'शेठ शांताराम' ह्यांचे कुटुंब फार मोठे. मुंबईत सर्वत्र विखुरलेले. सर्वांना एकमेकाबद्दल आस्था व आत्मीयता. लग्न-मुंज अशा समयी सर्वजण आवर्जून एकत्र येतात : ४० वर्षापूर्वी अरविंदभाऊने आपला मोठा भाऊ कै. शरदभाऊ ह्याला सोबत घेऊन आमच्या कुटुंबातील प्रत्येकाच्या घरी-काका, आत्या त्यांची मुलं-मुली सर्वांच्या घरी स्वत: जाऊन कौटुंबिक नातें कसं घट्ट करावं ह्याचा जणू धडाच सर्वांना दिला. ह्या मोहिमे अंतर्गत तेव्हां तो कारवारलाहि येऊन गेला. त्यानंतर अनेक वेळा तो आमच्याकडे राहून गेला. खास नवरात्रेत एकदा दहा दिवस राहून गेला. आमच्या बँकेचे संस्थापक म्हणजे माझे आजोबा 'शेठ शांताराम!' ७५ वर्षापूर्वी आपल्या ज्ञातीतील फार मोठे व्यक्तिमत्व. मुंबईपासून मंगळूरपर्यत त्यांचा कामाचा व्याप. परंतु आज कारवारमधील त्यांचे हे घर वगळता कुठेहि त्यांची वास्तू

नाही. हे अवाढव्य घर सांभाळतांना माझ्यासारख्या शिक्षकी पेशातील माणसास काय त्रास होत असतील त्याचा विचार अरविंदभाऊशिवाय अन्य कुणी कधीच केला नाही. आपणहून त्यानें ह्या घराच्या दुरुस्तीसाठी धनसाहाय्य केलेय. ते माझ्या दृष्टीनं फार मोलाचं होतं.

माझा मुलगा सचिन बी. कॉम. झाल्यावेळी इकॉनोमिक्स विषयात त्याला ९६% गुण मिळाले म्हणून आपल्या एज्युकेशन सोसायटीकडून त्याला खास बक्षीस मिळाले. त्या स्नेहसंमेलनास सचिनने स्वत: हजर राहून ते बक्षीस स्वीकारावे म्हणून अरविंदभाऊने त्याला येण्या–जाण्याच्या तिकीटासाठी एक हजार रुपये पाठविले. कां तर आपल्या कुटुंबातील एकाचा सत्कार होतोय ही त्यामागील त्याची सद्भावना !

आपल्या एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त म्हणून त्याने वीस वर्षे धुरा वाहिली. सोसायटीच्या निधीतून जास्तीतजास्त उत्पन्न येईल अशी गुंतवणूक करण्याची योजना प्रथमत: त्यानें सुरु केली. त्यामुळे सोसायटीचे उत्पन्न वाढले व अद्यापही वाढत आहे. त्याच्या योगदानाबद्दल सोसायटीने त्याला सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत करुन त्याचा सन्मान केला. आपल्या बँकेतर्फे शेठ शांताराम स्मृतीप्रीत्यर्थ एखाद्या प्रथितयश अर्थतज्ज्ञाचे व्याख्यान आयोजिण्यांत येते या प्रसंगी आधील वर्षांत सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बँकेच्या एका शाखेला प्रशस्ती पुरस्कार देण्याची प्रथा आहे. हा पुरस्कार आम्हां शेठ शांताराम कुलकर्णी यांच्या कुटुबियांनी गोळा केलेल्या निधीच्या व्याजातून दिला जातो. ही संकल्पना त्याचीच व यासंबंधी पुढाकार त्याचाच हे मुद्दाम नमूद करावयास हवे.

ह्या अरविंदभाऊविषयी माझ्या अल्पमतीनें अजुनही खूप कांही सांगण्यासारखे आहे. तरी मी आतां एवढेंच म्हणेन की असा हा सहृदयी, श्रध्दाळू, दयाळू, कृपाळू, प्रेमळ,कुटुंबवत्सल, सात्विक, निर्व्यसनी, सत्यवचनी पण तितकाच जिद्दी, धीरगंभीर आज आपल्यात नाही हा विचारच मला अस्वस्थ करतो. ही अल्पशा शब्दांत माझी त्याला भावपूर्ण श्रध्दांजली ! ईश्वर त्याच्या आत्म्यास चिरशांति व सद्गती देवो !

**शांताराम (अरुण)कुलकर्णी, कारवार**

## ठाणे मंच देणगीदारांची यादी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती शहना रघुवीर जॅक | गोरेगांव | १,५०० |
| २. | श्री. पद्माकर श्रीपाद तेलंग | वांद्रे | ३,००० |
| ३. | श्री. संदीप मोहन कसबेकर | मालाड | ३,००१ |
| ४. | श्रीमती अपर्णा सदानंद देसाई | ठाणे | ३,००० |

## उत्साही रंगकर्मी संजय नाडकर्णी याची आकस्मित एक्झिट



संजय आपल्यात नाही यावर अजून विश्वासच बसत नाही. मोबाईल वाजेल आणि पलीकडून 'किते करता रे' असा तो परिचित आवाज आणि त्याबरोबर ते मिश्किल हास्य कानी पडेल असा आभास होत राहतो.

संजयची व माझी ओळख मूळ शाळेपासूनची असली तरी कालांतराने आपल्या ज्ञातीतील सामाजिक कार्याच्या ओढीने आमची मैत्री अधिकाधिक दृढ होत गेली. त्याचे हसतमुख सकारात्मक दृष्टीकोन संघाचे व मुंबई मंचाचे कार्यक्रम आयोजित करताना नेहमीच प्रेरणादायी ठरत असे. सर्व सभासदांना एकत्रित घेऊन कार्यक्रमाची आखणी व्यावसायिक पातळीवर करण्यात त्याचा हातखंडा होता. विविध खेळांत व अंताक्षरीमध्ये युवा पिढीबरोबर वयोवृध्द मंडळींना एकत्र आणण्याचे कसब त्याच्यात दडलेले होते. वृध्दाश्रम व धर्मादाय संस्थांना भेट देणे व त्यांच्या आवश्यकतेनुसार सुविधा पुरविणे यात त्याची समाजसेवेबद्दलची बांधिलकी दिसून येत असे. मध्यंतरी त्याने मंचातर्फे आयोजित केलेल्या नेत्रदानाविषयीच्या कार्यक्रमातील आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला ही तर विशेष उल्लेखनीय बाब

नाट्य दिग्दर्शन व अभिनय हा तर संजयच्या जिव्हाळयाचा विषय 'सुंदर मी होणार ' या व्यावसायिक नाटकाची त्याने निर्मितीही केली होती. गतवर्षी त्याने मंचतर्फे उत्सव २०१२ मध्ये दिग्दर्शन व अभिनय केलेली 'कमरेक आयलॉ कस ' ही धमाल एकांकिका रसिकांच्या अजून स्मरणांत असेल. रंगमंचावर वावर करणारा हा कलाप्रेमी अकल्पितपणे रंगमंचावरुनच कायमची एक्झिट घेईल हे मनाला न पटणारे आहे.

खाजगी व्यवसायाचा व्याप सांभाळून ही सर्व क्रियाशीलता साधणाऱ्या संजयकडे माणसे जोडण्याची अजब कला होती. माटुंगा मित्रमंडळातील मित्रपरिवाराबद्दल आपुलकी, बालमोहनमधील वर्गमित्रांशी असलेला संपर्क आणि आपल्या सर्व संस्थांमधील सर्वांशी असलेली आत्मीयता यामधून ती प्रतीत होते. विविध पाककृती करण्यांतही त्याला रुची होती. त्याच्या हातची चिकन रश्शाची चव अजूनही जीभेवर रेंगाळते आहे.

मुंबई मंचाच्या स्थापनेपासून असलेला हा दुवा निखळल्याने निर्माण झालेली पोकळी भरुन येणे कठीणच आहे. व्यक्तीशः एका जिवलग मित्राला मी दुरावलो आहे. उरल्यात त्या त्याच्या निर्मळ व हृद्य आठवणी, अगदी त्याच्या प्रसन्न व्यक्तिमत्वासारख्या.

**डॉ. विवेक कुलकर्णी, दादर (मुंबई मंचतर्फे)**



## Maheshwar Sadashiv Nadkarni

**Birth : 5th October 1913 Mallapur**
**Demise : 29th November 1974 New Delhi**

*We cherish the happy moments spent with you and are proud to have been blessed with a father like you. We know you must be watching from above with that lovely smile.*

**Ganpati, Deepa, Ameya**


# Shailesh Gaitonde

**Account Consultancy**

Office : S/70, Goyal Trade Centre, Shantivan, Borivali (E), Mumbai 400066.
**Tel.:** (Off.) 022-28974402 (Mob.) 98692 11055 • **Office Time :** 10.00 a.m. to 6.00 p.m.

## COMPUTERISED ACCOUNTS SERVICES

- **FOR COMPANIES & PRIVATE FIRMS UPTO FINALISATION**
- **FOR CO-OP HSG SOCIETIES**
  - *Monthly / Quarterly Billing & Receipts of the Society*
  - *Accounts Books are maintained on Computer*
  - *Monthly or Annual Report*
  - *Statutory Audit from Panel Auditor*
  - *Finalization of Accounts*
  - *Administration of Society*
- **For Filling of Income Tax Returns & PAN Number**
- **For Personalized & Home Service**
- **(VACANCY FOR SOCIETY MANAGER, INTERESTED AND EXPERIENCED CANDIDATE PLEASE CONTACT)**

## निधन

| | | |
|---|---|---|
| प्रेमा (अप्रुबे) सदानंद बोरकर | (कडवाड) | ठाणे |
| कमल शंकर बोरकर | (कारवार) | उल्हासनगर |
| त्र्यंबक भवानीशंकर धुमे | (बाड) | दादर |
| सविता (इंदू) वसंत कसबेकर | (कडवाड) | पारले |
| मोहनदास प्रभाकर कुलकर्णी | (हळगे) | गिरगांव |
| *अरविंद जयवंत कुलकर्णी | (हळगे) | फोर्जेटस्ट्रीट |
| सुनंदा रजनीकांत मुळगांवकर (पूर्वाश्रमीच्या सुनंदा जगन्नाथ वागळे) | (बाड) | अंधेरी |
| दिनकर दत्तात्रय नाडकर्णी | (मल्लापूर) | ग्रांट रोड |
| चंद्रलेखा सुहास नाडकर्णी | (अंकोला) | ग्रांट रोड |
| प्रकाश घनश्याम नाडकर्णी | (सांवरपै) | दादर |
| महाबळेश्वर (संजय) मंगेश नाडकर्णी | (मिर्जन) | माहीम |
| नारायण अनंत फेणाणी | (चेंडिये) | दादर |
| दुर्गादास (माधव) नारायण स्थळेकर | (अंकोला) | पुणे |
| शशिकला वसंत तेलंग | (केरवडी) | बोरीवली |
| शांताराम (सुभाष) पुरुषोत्तम वागळे | (माजाळी) | पारले |
| सरला उमाकांत वागळे | (हाणकोण) | खार |
| सुनील विश्वेश वागळे | (हाणकोण) | ठाणे |
| तारा दिनकर वागळे | (बाड) | दादर |

* अरविंद कुलकर्णी यांनी नेत्रदान केलेले आहे.


Contact : Priya Prakash Telang

SHANTA CREATIONS

Shanta™

DIGITAL MEDIA
☐ Website Designing & Development
☐ Flash Web Banners and Presentation
☐ Optimised Flash Website ☐ and more...

PRINT MEDIA
☐ Brochure Designing
☐ Catalogues & Product Box Designing
☐ Outdoor Media ☐ and more...

3D & VFX
☐ 3D Modeling, Texturing, Rigging, Lighting
☐ 3D Animation
☐ 3D Architectural Walkthrough
☐ 3D Motion Graphics
☐ Visual Effect ☐ and more....

SH ANTA I PORTAL PVT. LTD.
Roman House, Opp. Tera Panth Bhavan, Nr. Cambridge School,
Thakur Complex, Kandivali (E), Mumbai - 400 101.
Cell : 93215 95487 / 98202 33202 • Tele/Fax : 022-2854 2421
www. shantacreations.com • info@shantacreations.com

## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

(मागील अंकानंतर)

उल्लेखनीय देणग्या

### श्री. अरुण कसबेकर यांजकडून आणखी एक लाख एक रुपयांची देणगी

आपल्या ज्ञातिबांधवांतील एक दानशूर हितचिंतक श्री. अरुण भास्कर कसबेकर त्यांना वंदनीय असलेल्या निरनिराळ्या व्यक्तींच्या स्मरणार्थ नेहमी वृध्दसेवानिधीसाठी भरघोस देणग्या देत असतात, हे आतां सर्वांना माहित आहे. ते स्वत: आपली कुलदेवता श्री. शांतादुर्गा हिचे निस्सीम भक्त आहेत. नुकतीच म्हणजे २४ जून रोजी त्यांच्या वयाची ७५ वर्षे पूर्ण झाली. त्या प्रसंगी श्री शांतादुर्गेच्या चरणी सेवा म्हणून त्यांनी संघाच्या वृध्दसेवा निधीसाठी एक लाख एक रुपयांची देणगी दिलेली आहे.

श्री. कसबेकर यांनी आतापर्यंत पंधरा प्रसंगी देणग्या दिलेल्या आहेत व त्या देणग्यांची एकूण रक्कम २७ लाख रुपये एवढी आहे.

### श्री.पंढरीनाथ (सुरेश) वागळे यांजकडून एक लाख दोन रुपयांची देणगी

आपल्या मूळ गांवी, मूळ घरांत अद्यापही वास्तव्यास असलेल्या ज्ञातिबांधवापैकी एक अपवादात्मक घराणे म्हणजे बाडचे वामनशणै वागळे यांचे वामनशणैचे एक सुपुत्र श्री. पंढरीनाथ ऊर्फ सुरेश यांनी अलीकडेच गोरेगांव येथे स्थलांतर केलेले आहे. त्यांच्या वयाला नुकतीच ७५ वर्षे पूर्ण झाली. त्या प्रसंगी त्यांनी व त्यांच्या पत्नी सौ. सुवर्णा यांनी आईवडील श्रीमती सुंदराबाई व श्री. वामन शेषगिरी वागळे यांच्या स्मरणार्थ एकूण एक लाख दोन रुपयांची देणगी दिलेली आहे. त्यातील रु. ५०,००१ संघाच्या समाजसेवानिधीसाठी आहेत तर ऊर्वरित रु. ५०,००१ एज्युकेशन सोसायटीसाठी आहेत.

### श्री.जयवंत (विनू) शेटगिरी यांच्या स्मरणार्थ वृध्दसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी

मूळ लक्ष्मेश्वर, कुंभारकेरी, अंकोला येथील कै. श्रीपाद नारायण शेटगिरी हे जुन्या जमान्यातले मोठे जमीनदार होते. त्यांचे एक दुकानही होते. त्यांचे एक सुपुत्र श्री. जयवंत (विनू) हे एअर इंडियामध्ये नोकरीला होते व बोरीवली येथे राहत होते. त्यांचे अलीकडेच म्हणजे जुलै महिन्यात दु:खद झाले. त्यांच्या पत्नी श्रीमती सीमा यांनी पतीच्या स्मरणार्थ वृध्दसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिलेली आहे.

### श्री. मंगेश नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ संघाला एक लाख एक रुपयांची देणगी

मूळ होन्नेकेरी, अंकोला येथील श्री. व्ही. टी. नाडकर्णी हे ज्ञातीच्या कार्यात विशेष रस घेत असत. आपल्या संघाची स्थापना नोव्हेंबर १९३५ साली झाली, तेव्हांच्या पहिल्या कार्यकारिणीचे ते क्रियाशील सभासद होते. त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. मंगेश नाडकर्णी यांनी वडिलांचा वारसा पुढे चालविला ते अत्यंत कुटुंबवत्सल होते. आपल्या पाठच्या भावंडाच्या

शिक्षणाला त्यांनी साहाय्य केले होते. कारवारकरांची पहिली सोसायटी 'प्रगती' ही स्थापण्यांत त्यांचाच पुढाकार होता. त्यांमुळे अनेक कारवारी कुटुबीयांची स्वस्तात राहण्याची सोय झाली.ते माटुंग्याच्या व्हीजेटी आयचे इलेक्ट्रीकलमधील डिप्लोमा होल्डर. अंतिम परीक्षेंत ते पहिल्या क्रमांकाने उतीर्ण झाल्यामुळे त्यांना पदक मिळाले होते. एस्. के. एफ्. या स्विडीश कंपनीत ते उच्च पदावर होते. बॉल बॅरिंग्स या क्षेत्रांत त्यांचा अनुभव दांडगा होता. इंडियन स्टँण्डर्डसच्या त्या विषयांवरील स्टॅण्डर्डस बनविण्याच्या समितीमध्ये तेही एक सभासद होते. त्यांनी आपल्या कंपनींत अनेक कारवारकरांना नोकरी मिळवून दिली होती. श्री. नाडकर्णी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांचे पुत्र दीपक व विकास आणि कन्या ज्योती व मेधा यांनी अलीकडेच संघाच्या समाज सेवा निधीसाठी एक लाख व एक रुपयांची देणगी दिली आहे.

### श्रीमती मंजुळा वागळे यांच्या जन्मशताब्दीप्रसंगी एज्युकेशन सोसायटीला ६१ हजार रुपयांची देणगी

राघववाडी, येथे राहणारे श्री. काशिनाथ गणपत वागळे हे व्यवसायाने वकील पण त्यांना साहित्य, अध्यात्म, समाजकार्य, यातच रस होता. त्यांच्या पत्नी श्रीमती मंजुळा या गेल्या शतकांतील एक बडे प्रस्थ नंदव्हाळ भवानी तेलंग यांच्या कनिष्ठ कन्या. सतत हंसतमुख चेहरा, अतिथ्यशील व स्वभावाने 'मायेस्त' अशी त्यांची ओळख होती. २२ ऑक्टोबर २०१३ रोजी त्यांची जन्मशताब्दी, त्याप्रसंगी मंजुळामामीचे सुपुत्र सर्वश्री शरद, विजय, रघुनन्दन व रमेश आणि कन्या श्रीमती सुधा पोटा, शिवांगी नाडकर्णी व मृणालिनी कसबेकर यांनी आईच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीला ६१ हजार रुपयांची देणगी दिलेली आहे.

### श्रीमती सुमन वागळे यांजकडून संघाला आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी

पुणे येथील श्री. रुद्रा रामचंद्र वागळे यांचे चार वर्षापूर्वी निधन झाले. त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती सुमन वागळे या दरवर्षी पतीच्या पुण्यतिथी प्रसंगी संघाला पतीच्या स्मृतीप्रीत्यर्थ देणगी देतात. यंदाही त्यानी समाजसेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी पाठविलेली आहे. पतीच्या स्मरणार्थ त्यांनी दिलेल्या देणग्यांची एकूण रक्कम तीन लाख रुपये एवढी आहे.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती उषा वासुदेव गायतोंडे यांच्या १९ व्या पुण्यतिथीनिमित्त पती श्री. वासुदेव शांताराम गायतोंडे यांजकडून. | ५,००० |
| २. | श्रीमती शांता (माई) व श्री. मंगेश (भाऊ) नेत्रावळी यांच्या विवाहदिनाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती शुभदा (गीता) रमेश वागळे यांच्याकडून. | ७,००० |
| ३. | श्रीमती इंदिराबाई व श्री. शंकर सदाशिव वागळे यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. किशोर यांजकडून. | १,००१ |

| | | |
|---|---|---|
| ४. | श्रीमती सुंदराबाई व श्री. वामन शेषगिरी वागळे यांच्या स्मरणार्थ स्नुषा श्रीमती सुवर्णा व पुत्र श्री. पंढरीनाथ वामन वागळे यांजकडून श्री. पंढरीनाथ यांच्या ७५ व्या वाढदिवसा प्रसंगी. | ५०,००१ |
| ५. | श्रीमती शांताबाई व श्री. मंगेश नारायण कंटक यांच्या स्मरणार्थ त्यांच्या मुलांकडून. | १०,००० |
| ६. | आईवडिल श्रीमती राधाबाई व श्री. सुब्राव आत्माराम दिवेकर, पुत्र डॉ. रामानंद व पत्नी श्रीमती शुभा यांच्या स्मरणार्थ श्री. मारुति सुब्राव दिवेकर यांजकडून. | १०,००० |
| ७. | श्री. मंगेश विनायक नाडकर्णी यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र सर्वश्री दीपक व विकास आणि कन्या ज्योती व मेधा यांजकडून. | १,००,००१ |
| ८. | श्रीमती सीताबाई (पॉय) शांताराम वर्टी (सदाशिवगड) यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी पुत्र, स्नुषा, कन्या व जामात, नातू व नाती पणतू व पणत्या व समस्त वर्टी कुटुंबियांकडून. | २५,००० |
| ९. | श्रीमती शांताबाई व श्री. गजानन अंबाजी बोरकर यांच्या अनुक्रमे ५ व्या व २५ व्या पुण्यतिथी निमित्त अनामिकेकडून | १,५०० |
| १०. | श्रीमती उमाबाई (रमा) शंकर (बापू) तेलंग यांच्या जन्मशताब्दीप्रसंगी नात श्रीमती समिधा व नात जावई श्री समीर मधुसूदन पंडित यांजकडून. | ५,००० |
| ११. | श्री. रुद्रा रामचंद्र वागळे यांच्या ४ थ्या पुण्यतिथीप्रसंगी पत्नी श्रीमती सुमन यांजकडून | ५०,००० |
| १२. | श्री. महेश्वर सदाशिव नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ त्यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी पुत्र श्री. गणपती यांजकडून. | ११,००० |
| १३. | श्री. निशिकांत लजपत नाडकर्णी यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी पत्नी श्रीमती उषा व कन्या अनिता, संगीता व वैशाली यांजकडून | १०,००० |
| १४. | श्रीमती वीणा अनिल नाडकर्णी यांजकडून ६० व्या वाढदिवसाच्या प्रसंगी | २५,००० |

## वृध्दसेवा निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. किशोर दत्तात्रय बोरकर यांजकडून ७५ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी. | १०,००० |
| २. | श्रीमती सविता वसंत कसबेकर यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. सतीश व स्नुषा श्रीमती जयश्री यांच्याकडून. | १५,००० |
| ३. | श्री. सुधाकर यशवंत कसबेकर यांच्या स्मरणार्थ पुतण्या श्री. सतीश व स्नुषा श्रीमती जयश्री कसबेकर यांजकडून . | ५,००० |
| ४. | श्री. मंगेश रुद्रा पालेकर यांच्या ६ व्या पुण्यतिथीनिमित्त बहीण श्रीमती सुजाता सुब्राय वागळे यांजकडून. | ५,००० |

५. श्री शांतादुर्गेच्या चरणी श्री. अरुण भास्कर कसबेकर यांजकडून त्यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्याप्रसंगी. १,००,००१

६. श्री. मनोहर गणपत वागळे यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती मालती यांजकडून २१,०००

७. श्रीमती दुर्गाबाई व श्री. यशवंत वेंकटराव कुलकर्णी यांच्या अनुक्रमे २६व्या व २१ च्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. व्यंकटेश व स्नुषा श्रीमती अश्विनी यांजकडून. १०११ १०११

८. श्री. अरुणकुमार सुंदरराव परुळकर यांच्या ११ व्या पुण्यतिथीनिमित्त कन्या श्रीमती आश्विनी व जामात श्री. व्यंकटेश यशवंत कुलकर्णी यांजकडून. १०११

९. श्री सुधीर कुलकर्णी यांजकडून खालील व्यक्तींच्या स्मरणार्थ
आईवडिल श्रीमती सरलाबाई व श्री. भालचंद्र विश्राम कुलकर्णी २५,०००
काका श्री. सुब्राय विश्राम कुलकर्णी. १०,०००

१०. श्री. जयवंत (विनू) श्रीपाद शेटगिरी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सीमा याजकडून. १,००,०००

११. श्रीमती शुभा मारुति दिवेकर यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पती श्री. मारुति सुब्राव दिवेकर यांजकडून. १५,०००

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

१. दिवंगत आप्तेष्टांच्या स्मरणार्थ श्री. जगदीश पांडुरंग वाघ यांजकडून. १०,००१

२. श्रीमती शांता व श्री. गोविंद नारायण नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ अनामिकेकडून २५००


३. श्रीमती मंजुळा काशिनाथ वागळे यांच्या स्मरणार्थ त्यांच्या जन्मशताब्दीप्रसंगी पुत्र सर्वश्री. शरद, विजय. रघुनन्दन व रमेश व कन्या श्रीमती सुधा पोटा, शिवांगी नाडकर्णी व मृणालिनी कसबेकर यांजकडून. ६१,०००

४. श्रीमती सुंदराबाई व श्री. वामन शेषगिरी वागळे यांच्या स्मरणार्थ स्नुषा श्रीमती सुवर्णा व पुत्र श्री. पंढरीनाथ वामन वागळे यांजकडून श्री. पंढरीनाथ यांच्या ७५ व्या वाढदिवसा प्रसंगी. ५०,००१

५. श्रीमती उमाबाई (रमा) शंकर (बापू) तेलंग यांच्या जन्मशताब्दीप्रसंगी
पुत्र श्री. शिवानंद यांजकडून, ५,०००
नातू डॉ. शैलेंद्र व नातसून डॉ. विद्या यांजकडून १०,०००

इतर देणग्यांचा तपशील जागेअभावी पुढील अंकात.

Regd. with Registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.